दै. पुण्य नगरी

25-7-2019

# 'दयानंद विज्ञान'मध्ये सुधारित अभ्यासक्रमावर कार्यशाळा

लातूर / प्रतिनिधी

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र बी. एस्सी., एम. एस्सी. व बी. एस्सी. सी. एस. प्रथम वर्षाच्या सुधारित अभ्यासक्रमावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संयुक्त सचिव सुरेश जैन, प्राचार्य व कार्यशाळा मुख्य कार्यवाहक डॉ. जयप्रकाश दरगड, संचालक अजिंक्य सोनवणे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, प्रमुख पाहुणे डॉ. भास्कर दवणे, बी. ओ. एस. सूक्ष्मजीवशास्त्र सदस्य प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी, बी. ओ. एस. संगणकशास्त्र सदस्य डॉ. पी. बी. खनाळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. संजय रेड्डी, कार्यशाळा समन्वयक डॉ. नंदिनी कोरडे, डॉ. रोहिणी शिंदे, डॉ. राहुल मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना संस्थेचे सचिव रमेश बियाणी म्हणाले की, बदलत्या काळानुसार बी. एस्सी.चा अभ्यासक्रम हा दर पाच वर्षांऐवजी तीन वर्षाला बदलला पाहिजे. कारण सध्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे. या युगात दररोज नवनवीन शोध लागत आहेत.

समाजाच्या गरजा बदलत आहेत. त्या बदलत्या गरजांनुसार अभ्यासक्रम मंडळ सदस्यांनी याची गांभीर्याने दखल घेऊन केवळ परंपरागत ज्ञानावर भर न देता नवीन अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. जेणेकरून विद्यार्थी स्वतःच्या पायावर सक्षम बनला पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक डॉ. नंदिनी कोरडे यांनी केले. सूत्रसंचलन ऐश्वर्या अंधारे यांनी केले. आभार डॉ. रोहिणी शिंदे यांनी मानले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयांतील संबंधित विषयाचे प्राध्यापक उपस्थित होते.

दै. लोकमत

9-7-2019

# विधी पळसापुरेची निवड

लातूर : प्रतिनिधी



राष्ट्रीय ख्यातीच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र एम. एस्सी. द्वितीय वर्षातील विधी पळसापुरेची राष्ट्रीय कोशिका केंद्र, एन. सी. सी. एस., पुणे येथे प्रोजेक्ट ट्रेनिंग प्रोग्रामसाठी निवड झालेली आहे. पाच महिन्याच्या या ट्रेनिंगसाठी जी ग्रेड वैज्ञानिक डॉ. योगेश सौशे हे मार्गदर्शक म्हणून लाभले आहेत. एम. एस्सी. चे शिक्षण चालू असतानाच तिच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निकषाधारे तिची निवड करण्यात आलेली आहे. ही बाब दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची आहे.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. मेघा पंडित, डॉ. राहूल मोरे, प्रा. आयेशा सिद्दीकी, डॉ. गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार आदी प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

दै० मराठवाडा नेता

9-7-2019

# विधी पळसापुरेची प्रोजेक्ट ट्रेनिंग प्रोग्रामसाठी निवड

लातूर :.....
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र एम.एस्सी. द्वितीय वर्षातील विधी पळसापुरेची राष्ट्रीय कोशिका केंद्र, एन. सी. सी. एस., पुणे येथे प्रोजेक्ट ट्रेनिंग प्रोग्रामसाठी निवड झालेली आहे. पाच महिन्याच्या या ट्रेनिंगसाठी जी ग्रेड वैज्ञानिक डॉ. योगेश सौशे हे मार्गदर्शक म्हणून लाभले आहेत. एम. एस्सी. चे शिक्षण चालू असतानाच तिच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निकषाधारे तिची निवड करण्यात आलेली आहे. ही बाब दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची आहे.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. मेघा पंडित, डॉ. राहुल मोरे, प्रा. आयेशा सिद्दीकी, डॉ. गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार आदि प्राध्यापक आणी शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

सिद्धेश्वर समाचार

2-2-2019

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षेत घवघवीत यश

दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षेत घवघवीत यश

लातूर,दि.१ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या विद्यापीठ परीक्षेतील विषयनिहाय सर्वप्रथम आलेल्या व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची यादी नुकतीच जाहीर झाली आहे.

त्यामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील कु. बिरादार तांबोळी आस्मा तुराब यांनी एम.एस्सी. रसायनशास्त्र या विषयातून विद्यापीठात सर्वप्रथम आल्याबद्दल ती डॉ. डी. एस. देशपांडे सत्कार समिती, नांदेड सुवर्णपदक व एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री या विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल डॉ. यशवंत बी. विभुते सुवर्ण पदकाची मानकरी ठरली आहे. कु. विधी सुभाष पळसापुरे ही बी.एस्सी. वनस्पतीशास्त्र या विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम आली, त्यामुळे ती प्रो. डॉ. डी. एल. रेड्डी सुवर्णपदक व बी.एस्सी. सुक्ष्मजीवशास्त्र या विषयात तीन वर्षात सर्वाधिक गुण प्राप्त केल्यामुळे स्वर्गीय. चंद्रशेखर सदाशिव अग्रवाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. याशिवाय कु. अग्रवाल साक्षी मनोज ही विद्यार्थीनी इलेक्ट्रॉनिक्स या विषयात सर्वप्रथम आली. त्यामुळे ती टी. एन. रेड्डी सुवर्णपदकाची हकदार ठरली आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मा. कुलगुरू डॉ. उध्दव भोसले यांच्या उपस्थितीत पद्मविभूषण मा. डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन, माजी अध्यक्ष भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) यांच्या हस्ते होणार आहे.

त्यांच्या या यशाबद्दल दयांनद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. युवराज सारणीकर, डॉ. नंदिनी कोरडे, सुक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. ए. मोरे आणि इलेक्ट्रानिक्स विषयाचे विभाग प्रमुख डॉ. ललित ठाकरे तसेच वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर स्वामी आदी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी अभिनंदन व कौतुक केले.

Daily Marathwadaneta 5-10-2018.

# रूसा कडून दयानंद विज्ञान महाविद्यालयास २ कोटीचे अनुदान

लातूर :प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रूसा) इन्फॉस्ट्रक्चर ग्रॅन्ट टू कॉलेज' या योजने अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयापैकी दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर या महाविद्यालयास दोन कोटी रूपयांचे अनुदान नुकतेच मंजूर झालेले आहे. स्वा रा ती मराठवाडा विद्यापीठातंर्गतील दयानंद विज्ञान महाविद्यालय हे नुकतेच प्रकाशित झालेल्या रूसाच्या यादीमधील अनुदानास प्राप्त ठरलेले एकमेव महाविद्यालय आहे, हे महाविद्यालयाचे ठळक वैशिष्ट्य आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी दिली.




या अनुदाना अंतर्गत महाविद्यालयातील भौतिक सुविधा प्रयोगशाळेचे नुतनीकरण, ग्रंथालय, मैदान, अद्यावत संगणिकीकरण, विविध संशोधनात्मक उपकरणे, . मुला-मुलींची सुसज्ज वसतिगृह अशा अनेक पायाभूत सुविधांचा विकास करून महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणखीन वृध्दिंगत करण्यात येणार आहे. सदरील अनुदानासंदर्भात महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला तेव्हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक व इतर बार्बीची गुणवत्तांचे असे सर्व निकष लावून रूसाने २ कोटीच्या अनुदानास मंजूरी दिली आहे. म्हणजेच, नॅकप्रमाणेच अशा प्रकारचे अनुदान प्राप्त करण्यासाठी विशेष निकष लावले जातात. त्या सर्व निकषानुसार दयानंद विज्ञान महाविद्यालयास हे अनुदान मंजूर झाले आहे.

या अगोदर दयानंद विज्ञान महाविद्यालयास नॅक तर्फे अ' दर्जा, स्वाराती मराठवाडा विद्यापीठातर्फे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, विद्यापीठ अनुदान आयोगाचा कॉलेज वूईथ प्रोटेंशन एक्सलन्स' भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचा फिस्ट'', स्वाराती विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार असे नामांकित बहूमान व पुरस्कार मिळालेले आहेत. या अनुदानामुळे भारताच्या अनेक महाविद्यालयापैकी दयानंद विज्ञान महाविद्यालय हे स्वतंत्र विज्ञान शाखेचे महाविद्यालय म्हणून क्रमवारीत अव्वल स्थानामध्ये रूपात नावारूपाला आले आहे. सदरील अनुदान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व समन्वयक डॉ. राहूल मोरे यांच्या अथक प्रयत्न व परिश्रमातून प्राप्त झाले आहे.

ह्या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. श्री. अरविंदरावजी सोनवणे, सचिव मा. श्री. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. श्री. सुरेशजी जैन, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

दै. एकमत

5-10-2018.



# दयानंद विज्ञान महाविद्यालयास रूसाकडून २ कोटींचे अनुदान

## मराठवाड्यातील पहिले महाविद्यालय अनुदानास पात्र

**लातूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रूसा) 'इन्फॉस्ट्रक्चर ग्रॅन्ट टू कॉलेज' या योजने अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांपैकी दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर या महाविद्यालयास २ कोटी रुपयांचे अनुदान नुकतेच मंजूर झालेले आहे.

स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठांतर्गातील दयानंद विज्ञान महाविद्यालय हे नुकतेच प्रकाशित झालेल्या रूसाच्या यादीमधील अनुदानास प्राप्त ठरलेले एकमेव महाविद्यालय आहे, हे महाविद्यालयाचे ठळक वैशिष्ट्य आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी दिली. या अनुदानांतर्गत महाविद्यालयातील भौतिक सुविधा प्रयोगशाळेचे नुतनीकरण, ग्रंथालय, मैदान, अद्ययावत संगणकीकरण, विविध संशोधनात्मक उपकरणे, मुला-मुलींची सुसज्ज वसतिगृह अशा अनेक पायाभूत सुविधांचा विकास करून महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणखीन वृध्दिंगत करण्यात येणार आहे. सदरील अनुदानासंदर्भात महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केला तेव्हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक व इतर बाबींची गुणवत्तांचे असे सर्व निकष लावून रूसाने २ कोटींच्या अनुदानास मंजुरी दिली आहे. म्हणजेच नॅकप्रमाणेच अशा प्रकारचे अनुदान प्राप्त करण्यासाठी विशेष निकष लावले जातात. त्या सर्व निकषानुसार दयानंद विज्ञान महाविद्यालयास हे अनुदान मंजूर झाले आहे.

**भौतिक सुविधा बरोबरच पायाभूत सुविधांचा होणार विकास**

या अगोदर दयानंद विज्ञान महाविद्यालयास नॅकतर्फे 'अ' दर्जा, स्वाराती मराठवाडा विद्यापीठातर्फे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, विद्यापीठ अनुदान आयोगाचा 'कॉलेज वुईथ प्रोटेंशन एक्सलन्स' भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञान

▶ पान ८ वर

## दयानंद विज्ञान...

विभागाचा 'फिस्ट', स्वाराती विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार असे नामांकित बहूमान व पुरस्कार मिळालेले आहेत. या अनुदानामुळे भारताच्या अनेक महाविद्यालयापैकी दयानंद विज्ञान महाविद्यालय हे स्वतंत्र विज्ञान शाखेचे महाविद्यालय म्हणून क्रमवारीत अव्वल स्थानामध्ये रूपात नावारूपाला आले आहे. सदरील अनुदान (रूसाने प्रकाशित केलेल्या यादीमध्ये महाराष्ट्रातील १५ महाविद्यालयास मंजूर, मराठवाड्यातील २ महाविद्यालय) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व समन्वयक डॉ. राहूल मोरे यांच्या अथक प्रयत्न व परिश्रमातून प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

दै. लोकमत

2-2-2021

epaper.lokmat.com २
औरंगाबाद, मंगळवार, दि. २ फेब्रुवारी २०२१

# दयानंद विज्ञानचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**लातूर :** स्वारातीम विद्यापीठ नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी एम.एस्सी. भौतिकशास्त्र व एम. एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र या पदव्युत्तर परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

एम.एस्सी. भौतिकशास्त्र या विषयात मोनिका कदम हिने ८५.२८ टक्के गुण घेऊन विद्यापीठात प्रथम आली. प्रांजली सरवदे हिने ८५.२८ टक्के गुण घेऊन द्वितीय तर सपना पवार हिने ८५.१६ टक्के गुण घेऊन याच विषयात तृतीय आली. याशिवाय एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात विधी पळसापुरे हिने ८७.८८ टक्के घेऊन विद्यापीठात प्रथम आली तर यशश्री दुधाट हिने ८०.७६ टक्के गुण घेऊन ती द्वितीय आली. या यशाबद्दल गुणवंतांचे कौतुक दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, डॉ. ललित ठाकरे, डॉ. राहुल मोरे ,डॉ. विश्वनाथ मोटे, प्रा. श्वेता लोखंडे, प्रा. लहु काथवटे, प्रा. वैशाली चांडक, डॉ. महादेव पंडगे, डॉ. विजेंद्र चौधरी, प्रा. मंगेश आवाळे, प्रा. आयशा सिद्दिकी, प्रा. शैलजा धुतेकर, प्रा. शीतल पाटील, प्रा. पूजा सोनसाळे, डॉ. महेश कराळे आदींनी केले.